# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२२ / अग्रहायण २१, १९४४ (शके)

### १४८. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते कि, सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संस्थगित झाले. संस्थगित झालेल्या सन २०२१ च्या तृतीय अधिवेशनातील एकूण ३७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र मंगळवार, दिनांक२८ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. उक्त जोडपत्रामधील १० लक्षवेधी सूचनांची निवेदने विभागाकडून प्राप्त झाली व त्याचदिवशी मा. सदस्यांकरीता राखून ठेवण्यात आलेल्या टपाल–खणाद्वारे वितरीत करण्यात आली होती. उर्वरित २७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १५ निवेदने दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रक भाग–२ क्रमांक २ अन्वये सन्मा. सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. तसेच प्रलंबित १२ स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६ निवेदने दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रक भाग–२ क्रमांक १२ अन्वये वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ६ प्रलंबित स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३ निवेदने दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग–२ क्रमांक १२९ अन्वये वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित ३ निवेदनांपैकी १ निवेदन दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग–२ व्दारे वितरीत करण्यात आले होते. आता एकूण ३७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या जोडपत्रामधील प्रलंबित २ लक्षवेधी सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाली असून यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १२ डिसेंबर, २०२२

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website)

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.:-

"जि. पुणे, ता.खेड, मौजे सावरदरी / वसुली येथे राहणाऱ्या सौ.सुलभा तुकाराम सोनावणे व इतर शेतकऱ्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून नुकसान भरपाई व प्रकल्पग्रस्त म्हणून १५% परतावा भूखंड योजने अंतर्गत एमआयडीसी महामंडळाकडून एकाच संपादीत क्षेत्राचा नावाखाली दोनदा भूखंड घेऊन कोटयावधी रुपयाचा आर्थिक घोटाळा केल्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदरहू सौ.सुलभा सोनवणे व इतर शेतक-यांची २०११ मध्ये एम.आय.डी.सी महामंडळाने टप्पा क्र.२ अंतर्गत जि.पुणे, ता.खेड मौजे वासोली येथील गट क्र.६३ व ६४ अंतर्गत १ हेक्टर ९१ आर व १ हेक्टर ४० आर इतके क्षेत्र संपादीत करणे, या क्षेत्राच्या मोबदल्यापोटी महामंडळाने सदरहू शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व प्रकल्पग्रस्त म्हणून १५ टक्के परतावा भूखंड क्र. पीएपी व्ही-१०४ क्षेत्रफळ ४९३५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड प्रकल्पग्रस्त दराने दि. ०४.०७.२०११ रोजी वितरीत करण्यात येणे, सदरहू शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व १५ टक्के भूखंड परतावा दिलेला असतानाही सदरहू शेतकऱ्यांनी शासनाची दिशाभूल व फसवणूक करुन, शासनाच्या एमआयडीसीच्या संबंधित अधिकारी यांच्याबरोबर आर्थिक संगनमत करुन पुन्हा त्याचा संपादीत केलेल्या जमीनीच्या गटापोटी महामंडळाकडून बी-७२ व डी-२७ मधील ४ कोटी ८० लाख ३७ हजार ५०० रुपये किमतीचा ९ हजार १५० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड प्रकल्पग्रस्त दराने केवळ ३६ लाख ६० रुपये किमतीला इतक्या अल्पदराने महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २८.१२.२०१८ च्या मिटींगमध्ये ठराव मंजुर करुन शेतकरी म्हणून सदरहू प्रकल्पग्रस्तांना दि. ०६.०३.२०२० रोजी पुन्हा भूखंड वितरीत केल्याचा घडलेला आश्चर्यजनक गैरप्रकार, सदर गैरप्रकारामुळे महामंडळाचे सुमारे ४ कोटी ४३ लाख ७७ हजार रुपये इतके प्रचंड आर्थिक नुकसान झाल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, सदरहू महामंडळाचे भूखंड क्र.डी-२७ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी दुय्यम निबंधक खेड क्र.२ पुणे दि.०३.६.२०२० दस्त क्र. ३५९४२/२०२० महामंडळाची पूर्व परवानगी न घेता सदरहू भूखंड श्री.सुमेरचंद तिलकचंद अग्रवाल यांना विक्री केल्याचा प्रकार निर्दशनास येणे, शासनाच्या प्रचलित दरानुसार विलंब शुल्कासह रक्कम वसूल करुन भूखंड मंडळाकडे जमा करण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शासकीय भूखंडाचा मोठ्या प्रमाणावर झालेला अपव्यय व प्रचंड आर्थिक नुकसान, सदरहू प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

चाकण औदयोगिक क्षेत्र टप्पा क्र. २ करीता मौजे -वासुली ता- खेड, जिल्हा पुणे येथील गट नंबर ६३ पैकी १.८७ क्षेत्र व ६४ पैकी १.४२ क्षेत्र असे एकूण ३.२९ हे आर क्षेत्र महामंडळाने संपादीत केले आहे. प्रकल्पग्रस्त खातेदाराने दिनांक २४.११.२०१० च्या अर्जान्वये संपादीत क्षेत्राचा तत्कालीन धोरणानुसार अनुज्ञेय १५ टक्के परतावा मिळणेबाबत हमीपत्रासह केलेल्या विनंतीनुसार १५ टक्के परतावा क्षेत्र ४९३५ चौ.मी खातेदारास वाटप करण्यात आले.

तदनंतर खातेदाराने दिनांक २२.०६.२०११ रोजीच्या विनंती अर्जान्वये सदर १५ टक्के परतावा क्षेत्राचे वाटपपत्र M/s.Sachin Engineering & Equipments Pvt. Ltd.यांचे नावे

मिळणेबाबत विनंती केली. पीएपी भूखंडाच्या सदर कंपनीत ५१ % भागभांडवल प्रकल्पग्रस्त खातेदार यांचे असल्याचे नमुद केले. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दिनांक ०४.०७.२०११ च्या पत्रान्वये भूखंड क्र. PAP-V-१०४ क्षेत्र ४९३५ चौ.मी. करीता वाटप पत्र दिले.

तदनंतर पीएपी भूखंड हस्तांतरण धोरणानुसार भूखंडधारक कंपनीच्या दिनांक २७.१२.२०१३ च्या विनंती अर्जानुसार कंपनीतील भागधारकांमधील बदलाची नोंद दिनांक २०.०१.२०१४ रोजीच्या पत्रान्वये घेण्यात आली. सद्यस्थितीत सदर भूखंड M/s. Sachin Engineering & Equipments Pvt. Ltd. कंपनीचे नावे आहे. सदर कंपनीचे भागधारक श्री सचिन महावीर आगरवाल व श्री सुमीत महावीर आगरवाल हे आहेत.

सदर खातेदार श्रीमती सुलभा सोनावणे यांनी उक्त नमूद परतावा क्षेत्र भूखंड ४९३५ चौ.मी. वाटपाच्या पूर्वी उक्त नमूद गट नंबर ६३ पैकीच्या १.८७ क्षेत्रापैकी ००.९१.५ हे.आर क्षेत्राचा मोबदला स्विकारला नव्हता तसेच भूखंडाचा ताबा देखील देण्यात आला नव्हता. तसेच खातेदार सदर ००.९१.५ हे.आर क्षेत्राच्या भूसंपादनास विरोध असल्यामुळे मोबदला स्विकारत नव्हते तसेच विकास कामामध्ये अडथळा निर्माण करत होते. त्यामुळे चाकण औद्योगिक क्षेत्रातील विकास कामे व जलवाहिनीची कामातील अडथळा दुर करण्याच्या दृष्टीने श्रीमती सोनावणे व इतर ४ खातेदारांना त्यांच्या संपादनाच्या बदल्यात तेवढ्याच क्षेत्राचा औद्योगिक भूखंड भूसंपादन दराने वाटप करण्याचा ठराव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. २८.१२.२०१८ रोजीच्या ३७८ व्या बैठकीत ठराव क्र. ५८३२ पारीत करण्यात आला.

संचालक मंडळाच्या सदर निर्णयाच्या अनुषंगाने सुलभा सोनावणे यांना ००.९१.५ हे.आर क्षेत्राच्या संपादनाच्या बदल्यात भूखंड क्र.बी ७२ क्षेत्र ६४४० चौ.मी. व भूखंड क्र.डी २७ क्षेत्र २९४४ चौ.मी. असे एकूण ९३८४ चौ.मी. अदला बदली भूखंड क्षेत्र वाटप करण्यात आले.

तथापि प्रकल्पग्रस्त श्रीमती सुलभा सोनावणे यांना तत्पूर्वी गट नंबर ६३ पैकी १.८७ हे.आर क्षेत्र व गट नंबर ६४ पैकी १.४२ हे.आर क्षेत्र असे एकूण ३.२९ हे.आर या संपूर्ण क्षेत्राकरीता ४९३५ चौ.मी. क्षेत्र वाटप करण्यात आले आहे. तथापि गट नंबर ६३ पैकी ००.९१.५ हे.आर क्षेत्राकरीता त्यांना संचालक मंडळाच्या सदर निर्णयानुसार एकूण ९३८४ चौ.मी. अदला बदली भूखंड वाटप करण्यात आले असल्याने पूर्वी वाटप केलेल्या ४९३५ चौ.मी. क्षेत्रामध्ये ००.९१.५ हे.आर क्षेत्राचा १५% परतावा मोबदला १३७२ चौ.मी.अतिरिक्त वाटप झाल्याचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या निर्दशनास आले.

श्रीमती सुलभा सोनावणे यांना मूळ पीएपी भूखंडाचे एकूण ३.२९ हे.आर क्षेत्रापैकी नुकसान भरपाई स्विकारलेले नाही असे ०.९१.५ हे.आर क्षेत्राचा पीएपी भूखंड अतिरिक्त वाटप झाला असल्याने त्याचे १३७२ चौ.मी. क्षेत्र महामंडळाने परत घेणे आवश्यक होते. तथापि पीएपी वाटप केलेला भूखंड क्र. PAP-V-१०४ क्षेत्र ४९३५ चौ.मी. उद्योजकांना पीएपी धोरणानुसार हस्तांतरीत झाला असून तो उत्पादनात गेला आहे. त्यामुळे सदर अतिरिक्त १३७२ चौ.मी. क्षेत्राकरीता श्रीमती सुलभा सोनावणे बदलीने वाटप केलेला भूखंड क्र.डी-२७, क्षेत्र २९४४ चौ.मी.महामंडळाने परत घेतला आहे. सबब, खातेदारांनी महामंडळाची दिशाभूल केल्याने त्यांना अतिरीक्त वाटप झालेल्या १३७२ चौ.मी. क्षेत्राच्या ऐवजी २९४४ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड परत घेण्याची कारवाई महामंडळाने केली आहे.

*******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा अंतर्गत कर्मचा-यांना औद्योगिक क्षेत्रामध्ये सदनिका देण्याबाबत शासनाचे विशिष्ट धोरण असणे, परंतु शासनाच्या धोरणांना मूठमाती देऊन अवैद्यपणे नियमबाहय रित्या प्लॅटचे वितरण झाल्याचे निदर्शनास येणे, त्यातच श्री. प्रकाश चव्हाण, अधिक्षक अभियंता यांनाही डोंबिवली एमआयडीसी क्षेत्रात प्लॅट वितरीत करण्यात येणे, श्री प्रकाश चव्हाण, अधिक्षक अभियंता यांनी पहिला प्लॅट अवैद्यपणे मिळविणे, आणि शासनाच्या नियमांना धाब्यावर बसवून तो प्लॅट त्यांनी विक्री केल्याचे निदर्शनास येणे, पहिला प्लॅट विक्री करुन आणखी दुसराही प्लॅटही मिळविणे, व पहिला असतानाही दुसरा मिळविणे व दोन्ही प्लॅटची अवैद्यपणे विक्री करणे अशा प्रकारे प्रकाश चव्हाण यांनी एमआयडीसीतील प्लॅट वितरणाचा दोन वेळा लाभ घेणे, सदर गंभीर प्रकार लोकप्रतिनिधींच्या लक्षात आल्याने याबाबत लोकप्रतिनिधींनी अनेक तक्रारी देणे, परंतु चुकीच्या पध्दतीने करण्यात आलेले वाटप अजूनपर्यंत रद्द न करणे, सदर प्रकरण अतिशय गंभीर असूनही त्याबाबत शासनाने अजूनपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करणे, त्यामुळे सदरहू प्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना"

मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

श्री राजेश एन. डोंगशनवार, मुख्य प्रवर्तक, नियोजित को-ऑप सोसायटी या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचा-यांनी स्थापन केलेल्या सोसायटीला निवासी प्रयोजनाकरीता डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात निवासी भूखंड क्र.RX-३३ क्षेत्रफळ ९९९ चौ.मी. प्रचलित निवासी दर रुपये १८००/चौ.मी. या दराने देकारपत्र दि.२२.०५.१९९८ रोजी देऊन दि.१४.१२.१९९९ रोजी वाटप करण्यात आले आहे.. सदर सोसायटीमध्ये १२ सभासद असून त्यापैकी एक श्री प्रकाश चव्हाण, अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे सभासद होते आणि त्याद्वारे श्री प्रकाश चव्हाण यांना पहिली सदनिका वाटप करण्यात आली.

श्री. प्रकाश चव्हाण हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दि. १५.०२.१९९५ च्या परिपत्रकाप्रमाणे Suitable Person या सदराखाली येत असल्याने आणि त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणाप्रमाणे कागदपत्रे सादर केली असल्याने त्यांना पात्र ठरवून सोसायटीमध्ये निवासी सदनिकाचे वितरण करण्यात आले.सदर भूखंड हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचा-यांना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या महामंडळाच्या धोरणानुसार प्रचलित निवासी दराने वाटप करण्यांत आला असून कोणतेही सवलतीचा दर आकारण्यात आलेला नाही. सदर सोसायटीमध्ये सर्व सभासद हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी/कर्मचारी आहेत. श्री प्रकाश चव्हाण यांना सदर सदनिका वाटप करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कर्मचारी म्हणून कोणतेही सवलतीचा दर आकारण्यात आलेला नाही. सबब, सदर सदनिका घेताना श्री. चव्हाण यांनी सवलतीच्या दराखाली भूखंड/सदनिका वाटप या योजनेचा लाभ घेतलेला नाही.

तसेच श्री. प्रकाश चव्हाण यांनी त्यांचे नांवे असलेली डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील निवासी भूखंड क्र.आर एक्स-३३ मधील क्र.२०२, क्षेत्रफळ १०२० चौ.फूट (९४.७९ चौ.मी.) सदर सदनिका महामंडळाच्या धोरणानुसार अधिमूल्याच्या १० टक्के फरकाची रक्कम वसुल करुन दि.०२.०७.२०१४ च्या आदेशान्वये श्रीमती मंजूषा राजीव फाटक यांच्या नावे हस्तांतरण करण्यात केली आहे. श्रीमती

मंजूषा राजीव फाटक या डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. डब्ल्यु-४५ या भूखंडावरील मे. स्टरलिंग फॅब्रीकेटींग इंजिनिअर प्रा.लि. या कंपनीमधील कर्मचारी होते व ते कंपनीमध्ये काम करत असल्याचे मे. स्टरलिंग फॅब्रीकेटींग इंजिनिअर प्रा.लि. यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास लेखी कळविले होते. त्यामुळे श्रीमती मंजूषा राजीव फाटक या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दि. १५.०२.१९९५ च्या परिपत्रकाप्रमाणे Suitable person असल्याने पात्र होत असल्याने महामंडळाच्या धोरणाप्रमाणे १० टक्के फरकाची रक्कम वसुल करुन हस्तांतर करण्यात आले आहे. सदरचे हस्तांतरण हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार/नियमाप्रमाणे झाले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दि. २८.१२.१९९९ च्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांना दि. २१.०९.१९९९ पासून सवलतीच्या दराने म्हणजेच प्रचलित औद्योगिक दराने भूखंड वाटप करण्याचे धोरण लागू करण्यात आले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदर योजनेनुसार श्री प्रकाश चव्हाण यांनी मुख्य प्रवर्तक श्री अविनाश कांबळे, नियोजित रायलादेवी माता एमआयडीसी कर्मचारी को-ऑप. हौ. सोसायटीमधून ठाणे औद्योगिक क्षेत्रात निवासी सदनिकासाठी सन २०२० मध्ये दुस-यांदा अर्ज केला आहे. श्री चव्हाण यांनी दुस-यांदा जागेसाठी अर्ज करताना महामंडळाच्या दि. १८.०२.२०१४ तसेच दि. १३.०३.२०२० च्या परिपत्रकान्वये प्रतिज्ञापत्र सादर केले होते तसेच अर्ज सादर करताना त्यांच्या नांवे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कोणत्याही औद्योगिक क्षेत्रात निवासी सदनिका/भूखंड नसल्याने त्यांना पात्र ठरविण्यात आले.

त्यानुसार, सदर सोसायटीमध्ये श्री प्रकाश चव्हाण यांना निवासी सदनिकाचे दुस-यांदा वाटप दि. १२.०३.२०२१ रोजी करण्यांत आले. सदर सोसायटीमध्ये ७९ सभासद असून त्यामध्ये श्री प्रकाश चव्हाण यांचा समावेश आहे. सबब सदर सदनिका/भूखंड घेताना श्री. चव्हाण यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार औद्योगिक दराने भूखंड वाटप करण्याच्या योजनेचा लाभ घेतला आहे.

तथापि श्री. प्रकाश चव्हाण यांनी वैयक्तीक कारणास्तव सदर सोसायटीमधील सभासदत्वाचा राजीनामा दि.२०.११.२०२१ रोजी दिला असून दि.२२.१२.२०२१ रोजीच्या सोसायटीच्या सभेत श्री प्रकाश चव्हाण यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार मऔवि महामंडळाने श्री. चव्हाण यांचे सोसायटीमधील सदस्यत्व रद्द केले आहे.

सबब, श्री. प्रकाश चव्हाण यांना डोंबिवली येथील पहिली सदनिका घेताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दि. १५.०२.१९९५ च्या परिपत्रकाप्रमाणे सदनिका/भूखंड वाटप करण्यात आले होते. श्री प्रकाश चव्हाण यांनी सदर सदनिका घेताना महामंडळाच्या सवलतीच्या दराखालील भूखंड/सदनिका वाटप या योजनेचा लाभ घेतलेला नाही. तसेच सदर फ्लॅट त्यांनी सन-२०१४ मध्ये श्रीमती मंजूषा राजीव फाटक यांच्या नावे हस्तांतरण करण्यात केला आहे.

तदनंतर श्री. चव्हाण यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक दराने भूखंड वाटप करण्याच्या योजनेचा लाभ घेऊन सन २०२० मध्ये ठाणे येथील गृहनिर्माण दुसरी सदनिका घेतली आहे. तथापि श्री. चव्हाण यांनी सदर सोसायटीमधील सभासदत्वाचा देखील राजीनामा दिला आहे. त्यानुसार मऔवि महामंडळाने श्री. चव्हाण यांचे सोसायटीमधील सदस्यत्व रद्द केले आहे.

सबब, श्री. प्रकाश चव्हाण यांना दोन्ही वेळेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार सदनिका वाटप करण्यात आले आहे. तथापि, मऔवि महामंडळाच्या कर्मचा-यांनी स्थापन केलेल्या सोसायटीमध्ये श्री. प्रकाश चव्हाण यांचे नावे सद्य:स्थितीत कोणतेही सदनिका नसल्याचे मऔवि महामंडळाने कळविले आहे.

........